

# गॉर्की उडतो

लेखक आणि चित्रकार : विल्यम स्टिग
मराठी अनुवाद : मानसी महाजन





# गॉर्की उडतो

लेखक आणि चित्रकार : विल्यम स्टिग


मराठी अनुवाद : मानसी महाजन



आई बाबा टाटा करून निघताच, स्वयंपाकघरात सिंक जवळ प्रयोगशाळा मांडून गॉर्कीने आपलं काम सुरु केलं. काचेच्या एका स्वच्छ पेल्यात थोडंसं पाणी घेतलं. त्यात थोडं हे थोडं ते टाकलं. एक एक चमचा चिकन सूप, चहा, व्हिनेगर घातलं. थोडी कॉफी, थोडी पावडर, थोडे मसाले शिंपडले. सगळं जोरजोरात हलवलं. पेला उजेडाकडे धरून त्याने ते कालवण पाहिलं - फारच गढूळ दिसतंय!


मग अगदी काळजीपूर्वकपणे, थोडी ब्रँडी त्यात घातली. आता जरा बरं दिसतंय. पण काहीतरी कमी वाटतंय - काय बरं?

हां! गुलाब अत्तर! आईचं सगळ्यात भारी अत्तर आणण्यासाठी गॉर्की प्रयोगशाळेतून बाहेर पडला. खरं तर त्याने दोनच थेंब अत्तर घालायचं ठरवलं होतं. पण अत्तराच्या सुगंधामुळे भारावून त्याने सगळंच, म्हणजे जवळजवळ अर्धी बाटली अत्तर पेल्यात ओतलं.



आत्ता जमलं! पेल्यातला जड ऐवज खाली बसला आणि वर लालसर सोनेरी असं पारदर्शक द्रव तयार झालं. त्यातले छोटे छोटे बुडबुडे अग्नी-कणांसारखे चमकत होते! अनेक दिवस गॉर्की शोधत असलेलं जादूचं द्रव एकदाचं तयार झालं! स्थिर हातांनी गोर्कीने बुडबुडे असलेला भाग अत्तराच्या बाटलीत गाळून घेतला आणि बाटलीला घट्ट बूच लावून टाकलं. मग तो बाहेर सूर्यप्रकाशात गेला.


झाडाच्या एका तुटलेल्या बुंध्यावर त्याने बाटली ठेवली आणि त्याभोवती खडे आणि फुलांची रांगोळी मांडली. मग दोन पावलं मागे जाऊन त्याने गंभीरपणे जादुई द्रव्यासमोर मान झुकवली - एकदा हात कडेला पसरून, एकदा समोर पसरून, एकदा बोटं भुवईला लावून आणि शेवटी हाताने पायाचे अंगठे धरून - प्रत्येक वेळा तोंडाने "आउगा लुगा ऊंगा ऊगा" असं म्हणत.




जादुई द्रव्यात नक्की काय जादू आहे ते आपल्याला थोड्याच वेळात समजेल याची त्याला खात्री होती. जेव्हां विशेष काही काम नसे, नुसतं बसून राहायचं असे, तेव्हां गॉर्कीला 'एलिफन्ट रॉक' या जागेवर जायला आवडत असे. तिथेच जायचे त्याने ठरवले.



क्लोव्हर गवताच्या छोट्या छोट्या पात्यांच्या कुरणांमधून आपले मोठे पाय घासत गॉर्की निघाला. काय सुरेख सुगंध होता! पॉगल ओढ्याकाठी थांबून त्याने पाण्याचा आवाज ऐकला. काय सुरेख संगीत होतं! ओढ्यात विखुरलेल्या दगडांवरून उड्या मारत त्याने ओढा पार केला आणि पुढे निघाला.



ग्रीष्म ऋतूची सुरुवात असल्यामुळे वातावरण स्वछ आणि तजेलदार होतं. गवत हिरवं गार होतं, आकाश निळं शार होतं. चहू बाजूना प्रकाशाने उजळून टाकलं होतं. एलिफन्ट रॉक ला पोहोचायची काहीच घाई नव्हती. गॉर्की हिरव्या गार गवतात, निळ्या शार आकाशाकडे बघत पसरला. शांत पडलेल्या गॉर्कीला सूर्यदेव आपल्या उष्ण बाहूंमध्ये कुरवाळत होते. सगळं जगंच जादुई होतं, आणि गॉर्कीच्या उजव्या हातात तर एक खास बाटली होती!




एक छोटा चमकणारा साप गवतातून सरपटत गॉर्कीच्या पोटावर चढला आणि त्याच्या बाटलीला तीनदा वळसा घालून निघून गेला. गॉर्की पेंगू लागला. आकाशात शुभ्र ढग त्याला वाळत घातलेल्या पांढऱ्या कपड्यांसारखे भासू लागले, आणि त्याला झोप लागली. बाहेरचं आकाश सूर्यप्रकाशाने झगमगत होतं, पण त्याच्या आतलं आकाश मात्र ताऱ्यांनी उजळून निघालं होतं.




ज्याने कशाने तो पृथ्वीशी बांधला गेला होता, ते जे काही होतं ते सुटलं आणि जणू पाण्यात एखादा बुडबुडा वर यावा तसं गॉर्कीचं झोपलेलं शरीर हवेत उडालं! उडत उडत पूर्व दिशेला जाऊ लागलं.



तो उठला तेव्हा तो आकाशाने घेरलेला असला तरी तो घाबरला नाही. ज्या हिरव्या गार गवतावर तो झोपला होता ते खूप खाली एखाद्या असीम गालिच्यासारखं दिसत होतं. गॉर्कीला हवेसारखं हलकं वाटत होतं, आणि आपण खाली पडणार नाही हे त्याला समजलं.



आपण खरंच जादूचा द्रव तयार केला आहे हे आता त्याला पुरतं उमगलं होतं. हातातल्या बाटलीमधून सोनेरी बुडबुडे थेट आपल्या हातात शिरतायत असं त्याला जाणवत होतं.





हवेत तरंगत तरंगत आपण कुठे पोहोचणार याबद्दल त्याला खूप कुतूहल वाटत होतं. तेवढ्यात त्याच्यावर एका भयंकर ड्रॅगनने आणि एका राक्षसी फुलपाखराने झेप घेतली! तो घाबरुन जोरात किंचाळणार तेवढ्यात त्याला समजलं - अरे! हे भीतीदायक प्राणी खरं तर पतंग आहेत!




पतंगांच्या दोऱ्या दोन कुत्र्याच्या पिल्लांच्या तोंडात होत्या. आपल्यामुळे ती पिल्लं अतिशय प्रभावित झाली आहेत हे गॉर्कीला समजलं - वेड लागल्यासारख्या उड्या मारत, भुंकत ती पिल्लं त्याच्याकडे बघत होती. त्यांना एकदा हात करून गॉर्की झाडांमागून वळून त्यांच्या दृष्टीआड गेला.



गॉर्कीकडे आता अनेकांचं लक्ष जात होतं. गॉर्की शेतांवरून भरारी घेत होता, कधी वर कधी खाली, कधी इकडे कधी तिकडे. आश्चर्यचकित, भांबावलेल्या, भेदरलेल्या नजरा आकाशाकडे वळत होत्या. शेतकरी काम सोडून त्याच्याकडे पाहत होते.




बोटीत बसून मासे पकडणारं डुक्कर हातातला दांडू सोडून वर बघू लागलं.




एक चित्रकार चित्र काढणं थांबवून वर बघू लागला.



झोपाळा मध्येच हवेत थांबवून ससा वर बघू लागला.



कोल्हा तोंडात पकडलेलं बदक सोडून वर पाहू लागला.
बदक पळून जाऊ लागलं, पण मग तेही थांबून वर पाहू लागलं.




प्रूनव्हिल मधील लोक खिडक्यांमधून वाकून वाकून, रस्त्यांवर धावत जाऊन वर आकाशात गॉर्कीची भरारी बघू लागले. घरातून, दुकानांमधून बाहेर येऊन काय चाललंय पाहू लागले. एका जहाजाच्या कप्तानाने तर आपली दुर्बीण गॉर्कीवर रोखली आणि काय गूढ आहे ते पाहू लागला. (हा उडतोय कसा? खाली का पडत नाही? कशाने धरले आहे याला?) एक रंगारी शिडीवर चढून भिंतीवर फराटे मारत होता. पिवळ्या रंगाने चिंब झालेला ब्रश तसाच हातात धरून तो निळ्या आकाशाकडे पाहू लागला.



सर्व जग आपल्याकडे बघत असताना गॉर्की शांत कसा बसू शकेल? त्याने माकडचाळे सुरु केले - काखेत अंगठे धरून डोळे तिरळे करून दाखवले, बूड हलवलं, पायांच्या टाचा एकमेकांवर आपटल्या आणि बोटं फिरवली. हवेच्या फुग्यातून सैर करायला निघालेले दोन ससे हा उलटा उडणारा बेडूक बघून विजेचा झटका लागल्याप्रमाणे एका जागी खिळून उभे राहिले.

खिळलेल्या सश्यांना तसंच सोडून गॉर्की अलगदपणे खाली झेपावला आणि त्याच्या चुलत भावाच्या 'गोगोल'च्या बागेवर उडू लागला. आता खरोखरच आपले चमत्कार दाखवायची त्याला हुक्की आली. गोगोल गवतावर खेळत होता. तेवढ्यात गॉर्की चाकासारखा गोल गोल फिरत समोर आला. गोगोल पाहताच राहिला! "गॉर्की! गॉर्की! काय चाललंय?" ओरडत त्याच्या मागे धावू लागला.

"मी चाललोय!" गॉर्कीने उत्तर दिलं, आणि तेवढंच बोलून तो पुन्हा आकाशात वर उडाला. आकाशात वर वर उडत जाताना गोगोलचा बावचळलेला चेहेरा आठवून त्याची हसून हसून मुरकुंडी वळली.



थोड्या वेळानंतर जसा तो शांत झाला, तसं आपण काळ्याकुट्ट ढगांखाली असल्याचं त्याला दिसलं. ढगांनी पृथ्वीवर आपली उदासवाणी सावली टाकली होती. निळं शांत आकाश कधीच मागे पडलं होतं.



अचानक भयंकर वादळ सुरु झालं. विजेचा कडकडाट सुरु झाला. सपासप पडणाऱ्या गारांनी गॉर्कीचं अंग शेकाटलं जाऊ लागलं. वाऱ्याच्या जोरदार वेगामुळे तो इकडे तिकडे फेकला जाऊ लागला. त्याची पॅन्ट जवळजवळ फाटलीच! आता ही मजा उरली नव्हती. बराच वेळ असं सुरु राहिलं. गारांच्या जागी आता पावसाचे मोठं मोठाल्ले थेंब पडू लागले.

शेवटी एकदाचं परत निळ्या आकाशात आल्यावर त्याला खूप हायसं वाटलं. तो वादळाच्या वर उचलला गेला होता. खाली ढगांमध्ये वीज चमकताना दिसत होती, आणि थोडा गडगडाट ऐकू येत होता. वादळ सुरूच होता, पण आता गॉर्की जागचा हालत नव्हता.



दिवस सरला. आकाश तांबूस झालं. रात्र पसरली. खाली गावाचे दिवे दिसू लागले, आणि गॉर्कीला जाणवलं कि तो अजिबात हालत नव्हता. हँगरवर लटकवलेल्या कपड्याप्रमाणे तो आकाशात टांगला गेला होता.



बराच वेळ तसाच लटकत तो विचार करत होता - आपण नक्की कुठे आहोत? आजूबाजूला काहीही नव्हतं, फक्त शांत रात्र आणि ताऱ्यांचा चमचमणारा समुद्र - जणू तो स्वप्नात होता. त्या अवस्थेत तो स्वतःला असे प्रश्न विचारू लागला ज्यांची उत्तरे त्याच्याकडे नव्हती. तो कुठे आहे हे कोणालातरी माहित होतं का? देवाला तरी ठाऊक होतं का? आई बाबांना? आत्ता तो घरी असता, आपल्या मऊ मऊ पलंगावर झोपलेला असता तर किती बरं झालं असतं! गॉर्की खूप दमला होता.



आपण परत कधीच घरी पोहोचू शकणार नाही का? त्या जादुई द्रव्यामुळे तो हवेत तरंगू शकत होता. बाटली सोडून दिली तर? बाटलीबरोबर तो सुद्‌धा थेट जमिनीवर जाऊन पडला असता. त्याने बाटली जास्तच घट्‌ट धरून ठेवली. त्याला जागं राहणं भाग होता, नाहीतर धाड्‌कन खाली पडून तो मेला असता.


पहाट झाली. आकाश उजळू लागलं. अचानक गॉर्कीला एक भन्नाट कल्पना सुचली आणि त्याला दचकून जग आली. बाटलीतून एक एक थेंब द्रव्य बाहेर टाकलं तर? जादू हळू हळू कमी होईल ना! करून तर बघू - त्याने विचार केला.



बाटलीचा बूच उघडून त्याने एक थेंब द्रव्य बाहेर ओतले. त्याबरोबर तो पडला - धडाम - आणि अचानक थांबला!


पुन्हा तसाच घडलं - अजून एक थेंब, अजून थोडा खाली जमिनीकडे. तिसऱ्या खेपेला त्याने तीन चार थेंब ओतले आणि तो इतका जोरात खाली आला की त्याला वाटलं आता मेलोच! त्यांनतर मात्र एका थेंबापेक्ष जास्त द्रव्य ओतायचं त्याचं धाडस झालं नाही.

सूर्य वर येत होता, आणि गॉर्की - नशिब त्याचं - खाली जात होता - एक थेंब थोडं खाली, एक थेंब थोडं खाली. लवकरच तो जमिनीच्या अगदी जवळ आला. जमीन किती छान दिसत होती! द्रव्याच्या जादूचाच परिमाण होता की काय काय माहित - पण तो एलिफन्ट रॉक च्या बरोबर वर उतरत होता!




शेवटचे दोन थेंब (आणि एक अख्खा दिवस) खर्च करून तो एकदाचा खडकावर फतकल मारून बसला होता. जेमतेम जमिनीपर्यंत पोहोचू शकेल एवढंच द्रव्य बाटलीत होतं तर! नाही - एक थेंब अजून होता! बाटली उपडी केल्यावर तो शेवटचा थेंब बाटलीच्या तोंडाशी रेंगाळला, आणि टपकन एलिफन्ट रॉक वर पडला.

एक विलक्षण गोष्ट घडली - चमत्कारच म्हणा! एलिफन्ट रॉक हलू लागला, थरथरू लागला. खडकाच्या दोन्ही बाजूला पंख्यासारखा एक एक कान उगवला, एक सोंड फुटली, आणि एक चित्कार ऐकू आला. गॉर्की एका खऱ्या खुऱ्या हत्तीवर स्वार होता! अनेक करोड वर्ष ज्या जागेवर हत्ती उभा होता त्या जागेवरून आता तो डुलत डुलत पुढे जाऊ लागला.



दवाने ओलसर झालेल्या गवतातून डुलत डुलत हत्तीने गॉर्कीच्या घराचा रस्ता धरला.



गोगोल तर डोळे फाडून बघत बसला! काल पंखांशिवाय उडत जाणारा गॉर्की आज हत्तीवरून फिरतोय!

गॉर्कीचे आई बाबा रात्रभर त्याला शोधात होते. गॉर्कीच्या काळजीने वेडेपिसे झाले होते. घराजवळ सगळीकडे, प्रत्येक झुडुपात, प्रत्येक दगडाखाली, झाडांमागे, प्रेत्येक लहान सहन फटीत सुद्धा त्याला शोधात होते.




समोरून डुलत येणार प्रचंड हत्ती त्यांना दिसला, त्यावर बसलेला खरंच आपला मुलगा आहे याची त्यांना खात्री पटली आणि ते हत्तीमागे ओरडत धावू लागले. "गॉर्की! बाळा! कुठे होतास तू! कुठे कुठे शोधलं तुला!"

"मी पृथ्वीवर नव्हतोच!" गॉर्की म्हणाला.

"काय! तू कुठे नव्हतास?" आई आश्चर्याने म्हणाली .

"हा हत्ती कुठून आला?" बाबांनी प्रश्न पडला.


एक खोल श्वास घेऊन गॉर्कीने घडलेली सगळी हकीकत त्यांना सांगितली.



बाबांचा गॉर्कीच्या सांगण्यावर अजिबात विश्वास बसेना. त्याच्या लाडक्या आईचा सुद्धा विश्वास बसेना. "बरं!" गॉर्की उद्गारला. "हा जिवंत हत्ती म्हणजेच एलिफन्ट रॉक आहे! तिथे आता खडक नाही आहे."

"काहीही!" बाबा चिडून म्हणाले. "एलिफन्ट रॉक नाही असं कसं होऊ शकतं? मला प्रत्यक्ष बघितलंच पाहिजे!"

एलिफन्ट रॉक होता त्या जागेवर पोहोचल्यावर गॉर्कीचे आई बाबा आ वासून बघत बसले - आधी बोडक्या जमिनीकडे, आणि मग हत्तीकडे. त्यांच्या तोंडातून शब्दच फुटेनात.



शेवटी बाबा म्हणाले "चाल बाळा, एवढा वेळ उडून तू दमला असशील. घरी जाऊन विश्रांती घे!"